# प्रकरण - पहिले

लोकशाही देशात सार्वजनिक जीवनात वृत्तपत्रांना अत्यंत महत्वाचे स्थान असते. जनहित आणि जनतेचे स्वातंत्र्य यांची जणू ती रखवालदारच असतात. तसेच वृत्तपत्रे लोकशाही समाजाचे सांस्कृतिक पर्यावरण आणि लोकमत यांची जडण-घडण करतात. वृत्तपत्रे ही मोठी सामाजिक शक्ती आहे. पाश्चात्य देशात त्याचा उल्लेख ` fourth estate of the kingdom असा केला जातो. समाज मनावर आपल्या विचारांचे संस्कार हळूहळू पण ठामपणे रुजविण्याचे कार्य वृत्तपत्रे करतात. सातत्याने समाजमनावर संस्कार घडविणे हे वृत्तपत्राचे वैशिष्टय होय. मराठीतील वृत्तपत्र किंवा बातमीपत्र हा शब्दप्रयोग इंग्रजीतील ` News Paper ` या शब्दावरून आला आहे. नित्याच्या व्यवहारात(घडणाऱ्या सामाजिक,राजकीय,आर्थिक इ. ) घटना दररोज बातम्यांच्या स्वरूपात प्रसिध्द करणाऱ्या पत्राला ` वर्तमानपत्र ` किंवा ` बातमीपत्र ` असे संबोधण्यात येते. या सर्व पत्र प्रकारांना उद्देशुन ` दैनिक ` हा शब्द प्रयोग रूढ झालेला दिसतो अशा दैनिकांत व्यवहार,राजकारण,समाजकारण आदी क्षेत्रात घडलेल्या घटनांची माहिती असते.`[१] त्यामुळे व्यवहारात घडणाऱ्या घटना बातम्यांच्या स्वरूपात दररोज प्रसिध्द होतात त्यांना वृत्तपत्र म्हणावयास हरकत नाही.`[२] प्रस्तुत प्रकरणात वृत्तपत्राचे बदलते स्वरूप व वृत्तपत्रांचे कार्य, मराठी वृत्तपत्रांच्या विकासाचा आढावा , ` पुढारी ` ची स्थापना आणि पुढारीकार ग.गो.जाधव यांचे पूर्वायुष्य व त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडण घडण इ.मुद्यांची चर्चा केली आहे.

वृत्त संकलन,मांडणी,सजावट इत्यादी दृष्टींनी मात्र मराठी वृत्तपत्रांचे स्वरूप बरेच सुधारले आहे. मराठी वृत्तपत्रे आता खऱ्या अर्थाने ` वृत्त ` देणारी पत्रे झाली आहेत. त्यांतील बातम्यांचा एक सुरीपणा कमी झाला असून त्यात

विविधता आली आहे. राजकारण व राजकारणी व्यक्ती यांना अद्यापही प्राधान्य मिळते हे खरे. पण हा दोष एकूणच भारतीय वृत्तपत्रांत आढळतो. राजकीय बातम्यांबरोबरच आता व्यापार, उद्योग, देशी-विदेशी खेळ या संबंधातील बातम्या, तसेच चित्रपट व नाटके यांची विस्तृत परीक्षणे व वर्णने योग्य त्या परिभाषेसहित मराठी वृत्तपत्रांत येऊ लागली आहेत. आकाशवाणी व दूरदर्शनवरील कार्यक्रमांच्या साक्षेपी परीक्षणानां वृत्तपत्रात स्थान देण्याचा आवर्जून प्रयत्न होतो. संगीत, नृत्य आणि चित्रप्रदर्शने इ. कलाउपक्रमांची दखल घेतली जाऊ लागली आहे. आठवडयातून त्यासाठी काही रंजन पुरवण्याही प्रसिध्द होऊ लागल्या आहेत. शेती, उद्योगधंदे, सहकार, ग्रामीण अर्थव्यवस्था व व्यवहार इ. बाबत विस्तृत वृत्त व शास्त्रीय विवेचनाची बैठक असलेले चर्चात्मक लेख यांनाही वृत्तपत्रांत स्थान मिळू लागले आहे. विज्ञानविषयक लेखनाबाबत ही आस्था वाढत आहे. कांही प्रमुख दैनिकांनी आठवडयातून एक दिवस खास विज्ञान पुरवणी देण्यास सुरुवात केली आहे. यामुळे मराठी वृत्तपत्रे राजकारणालाच प्राधान्य देतात, असा जो त्यांचा बरा-वाईट पण सार्थ लौकिक एक वेळ होता, तो आता पुष्कळ कमी झाला आहे. काळ झपाटयाने बदलत असून वाचकांची अभिरुचीही बदलली आहे. वृत्तपत्रांच्या स्वरूपात हा जो बदल होत आहे, त्याला वाचकांची अभिरुची व त्यानुसार अपेक्षा या गोष्टी कारणीभूत आहेत. वाचकांचे बातम्यांचे आकर्षण खूपच वाढले आहे. बातम्या जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या बातम्या, ताज्या वाचकांना हव्या आहेत. वृत्तपत्रांनी विविध प्रकारच्या बातम्या भरपूर प्रमाणात व वैशिष्टयपूर्ण रीतीने दिल्या की मग संपादकीपान कोणतीही मते मांडलेली असली तरी त्याबद्दल वाचक फारशी तक्रार करीत नाहीत. वृत्तपत्राचा खप एकंदर वृत्त संकलन, वृत्तप्रदर्शन व मांडणी आणि प्रसार संघटना यांवर प्रामुख्याने अवलंबून राहू लागला आहे.

महत्वाच्या विषयावर अग्रलेख, किरकोळ विषयाची स्फुटे, बातम्या, व्यावहारिक लोकोपयोगी अशा विविध विषयांची दुसरी कडून आलेली किंवा संपादकीय खात्याने तयार केलेली माहिती, नवीन प्रसिध्द होणाऱ्या पुस्तकांचे

समालोचन अशा त-हेच्या मजकुराने वृत्तपत्रे सजविण्याचा हा प्रघात रुढ व जवळ - जवळ सर्वसामान्य झाला आहे.[३] वृत्तपत्रांचा इतिहास लिहिताना श्री.रा.के.लेले व श्री.वि.कृ.जोशी यांनी दैनिकांसोबत साप्ताहिक आणि पाक्षिकांचाही समावेश वृत्तपत्रांतच केलेला दिसतो. प्रा.न.र.फाटक यांनीही या मताला दुजोरा दिला आहे. ते म्हणतात ` दर्पण ` बंद झाल्यावर मुंबईला मराठी नियतकालिकावाचून फार दिवस काढावे लागले नाहीत . १८४१ साली ` प्रभाकर ` नावाच्या साप्ताहिकाने दर्पण पेक्षा जास्त यथार्थतेने वृत्तपत्रांच्या कामगिरीला प्रारंभ केला `[४] दैनिकांची छपाई रोजच्या रोज होत असल्याने ती काळासोबत धावत असतात. दररोजची ताजी बातमी वाचण्याच्या वाचकांच्या प्रवृत्तीमुळे दैनिकांची संख्याही वाढत आहे. नियतकालिकापेक्षा वृत्तपत्रांचे प्रभावक्षेत्र जास्त व्यापक आहे. राजकीय व सामाजिक प्रश्नांबाबत लोकमताला वाचा फोडणे आणि त्यांना योग्य ते वळण लावणे या कार्यासाठी वृत्तपत्रेच अधिक समर्थ ठरतात.

## वृत्तपत्राचे कार्य --

कोणतीही सामाजिक समस्या समाजापर्यन्त पोहोचवण्यासाठी नियतकालिकांएवढे समर्थ कार्य वृत्तपत्रांने केले आहे. एखादा नवा विचार,तत्व किंवा कायदा हा समाजमनात एकाएकी रुजवणे कधीही शक्य नसते. त्यासाठी समाजमनाची अगोदर तयारी करावी लागते. त्याच्या मनात विचार जागृतिची बीजे पेरावी लागतात. हे कार्य अधिक समर्थपणे पार पाडण्यासाठी नियतकालिकेच अधिक उपयोगी ठरतात. बातमी देणे व टिकाटिप्पणी करणे हे वर्तमान पत्रांचे प्रमुख कार्य आहे. मुद्रणामुळे लिखित मजकुरांच्या असंख्य प्रती मोठ्याप्रमाणात उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे एकच विचार एकाच वेळी असंख्य वाचकांच्या मनात रुजवणे शक्य होते. लोकशाहीचा अवतार, शिक्षणाचा प्रसार आणि दळणवळणाच्या साधनात झपाट्याची वाढ याची जोड मिळताच हे युग

क्रांतिकारक ठरले. लष्करी शक्तीपेक्षा वृत्तपत्रहि मोठी शक्ती ठरली. जनतेच्या हक्कांचे ते राखणदार झाले. लोकमताला वाचा फोडणे आणि लोकमताला वळण लावणे या दुहेरी कर्तव्यामुळे राष्ट्रीय जीवनात वृत्तपत्रांना अग्रस्थान प्राप्त झाले. वृत्तपत्रांचे हे शस्त्र कसे वापरावे याचा पहिलाच धडा सरकारी अधिकाऱ्यांनी आणि युरोपियन मिशनऱ्यांनी हिन्दी लोकांना दिला.[5] या शिक्षणाचा फायदा मराठी नियतकालिकांनी, वृत्तपत्रांनी पुरेपूर घेतला ` वर्तमान पत्रे म्हटली म्हणजे देशातील सर्व लोकांचे वकील होत, यामुळे कोणाची भीड वा मुवत न धरता त्यास खरे व हितकारक असेल तेच बोलले पाहिजे. कोणाच्या तोंडासारखे बोलून पोकळ मनधरणी करण्याची गरज नाही. त्याचे कर्तव्य हेच आहे की खरे असेल तेच बोलावे मग त्यात कोणाची मर्जी जावो अथवा राहो. थोरांच्या मर्जीखातर बहुलोकहितास धक्का द्यावा हा त्याचा धर्म नाही.[6] असे मत डॉ. हरिश्चंद्र निमळे यांनी व्यक्त केले आहे. या गुण वैशिष्टयामुळेच सामाजिक मार्गदर्शनाचे सामर्थ्य नियतकालिकांच्या व वृत्तपत्रांच्या ठिकाणी येते. तत्वनिष्ठा, स्पष्टवक्तेपणा, निर्भिडवृत्ती, ` इष्ट असेल तेच बोलणार ` असा आगरकारी बाणेदारपणा इ. गुणांमुळे हे सामर्थ त्यांना प्राप्त झाले.

सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि शैक्षणिक अशा विविध चळवळींच्या यशस्वीतेसाठी नियतकालिके, लोकसंग्रह, लोकमानस आणि लोकबळ तयार करित असतात. वृत्तपत्रे हि एका अर्थाने मतपत्रे असतात. बहुतेक वृत्तपत्रे कोणत्या ना कोणत्या विचारसरणीस वाहिलेली असतात अशा अलौकिक सामर्थ्यामुळेच एकेकाळी महाराष्ट्रात नियतकालिकांनी समाजमनावर आपली मोठीच जरब बसविली होती. केवळ सरकारवरच नव्हे तर समाजातील अनिष्ठ चालिरितीवरही ती बेधडकपणे तुटून पडत. जगातल्या व्यवहाराचे, विज्ञानांचे आणि संस्कृतिचे ज्ञानकोश समाजमनात बिंबवून, त्याचे मन विशाल व्यापक बनवून त्याला बहुश्रुत करण्याचे श्रेय नियतकालिके व वृत्तपत्रे घेत असतात. ` वर्तमान ` हा नियतकालिकांचा प्रमुख जीवनाधार मानण्यात येतो पण ` वर्तमान ` म्हणजे ` बातमी ` हा जो आधुनिक अर्थ त्या शब्दास प्राप्त झाला आहे, तो मात्र

प्रारंभीच्या नियतकालिकांच्या संदर्भात वापरता येत नाही कारण ती वृत्तपत्रे नव्हती तर ज्ञानपत्रे होती. वर्तमान जीवनाविषयी उपयुक्त, बोधप्रद व विचार प्रवर्तक लेख प्रकाशित करून समाजाचे उद्‌बोधन करणे हे त्याचे महत्वाचे प्रयोजन होते. वस्तुस्थितीची लोकांस माहितगारी होऊन, त्यांची मने जागृत होऊन ती पुरोगामी विचाराकडे वळावी यासाठीही वृत्तपत्रे व नियतकालिके झटतात.`७

सामाजिक सुधारणांचे नियतकालिकावलंबित्व हे अभेद्य आहे. ब्रिटिशांनी आपल्या राज्यविस्तारा सोबतच धर्मप्रसारालाही सुरुवात केली. ख्रिस्ती धर्माचा हिंदू लोकांत जोरदार प्रसार व्हावा आणि त्यांना ख्रिस्ती धर्माविषयी आपुलकी वाटाव्यास लावून आपल्या धर्माकडे आकृष्ट करावे यासाठी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी हिंदू धर्मातील विविध दोषांवर बोट ठेवले. हिंदूस्थानात हिंदु धर्माविषयी घृणा निर्माण करण्याची त्यांची धडपड सुरु होती आणि नेमके याच वेळी महाराष्ट्रातील जाणती व विचारवंत मंडळी खडबडून जागी झाली. आपला उत्कर्ष साधावयाचा असेल तर आपण पहिल्यांदा ज्ञान मिळवून शहाणे झाले पाहिजे याची जाणीव त्यांनी समाजाला करून दिली. जातिभेद, विधवा विवाह, स्त्री-शिक्षण यासारख्या आपल्या समाजातील अनेक दोषावर त्यांनी टिकेची झोड उठविली. जातिभेद निरसन आणि आपल्या नवविचारांची बीजे समाजमनात पेरण्यासाठी त्यांनी नियतकालिके व वृत्तपत्रे याकडे धाव घेतली. मराठी भाषेतील पहिले पाक्षिक `दर्पण` याच विचार जागृतीच्या ध्येयाने झपाटलेल्या अवस्थेत जन्माला आले. मनोरंजन करणे, चालते काळाची वर्तमाने कळविणे आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे या गोष्टींची `दर्पण` छापणाऱ्यांना मोठी उत्कंठा होती.`८ वृत्तपत्रे आणि समाजजीवनाचा संबंध अन्योन्य आहे. देशकाळ परिस्थितीचा आणि सामाजिक जीवनाचा जसा वृत्तपत्रांवर परिणाम होत असतो तसाच वृत्तपत्रांचाही परिणाम समाजजीवनावर होत असतो.

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

वृत्तपत्रे व नियतकालिके यांचे कडून होणाऱ्या सामाजिक विचार जागृतीमुळे समाजातील पुर्वापार चालत आलेले संकेत, रुढी, चालीरिती, अंध:श्रध्दा आणि धर्म कल्पना यांना तडे जाऊ लागले. नवी संस्कृती निर्माण व्हावी, नव्या बाण्याची, नव्या निर्धाराची मने तयार व्हावीत यासाठी एकोणिसाव्या शतकात सामाजिक सुधारणांना प्राधान्य लाभले होते. सामाजिक समस्या सोबतच शैक्षणिक, आर्थिक, राजकीय असे विविध प्रश्न सोडविणे गरजेचे वाटून तात्कालीन महाराष्ट्रीय संस्कृतीत वाढलेल्या पण नव्या संस्कृतीचा हव्यास धरणाऱ्या लोकहितवादी आगरकर, परांजपे, प्रभृतींनी आपल्या लेखनास प्रारंभ केला होता. या सर्व लेखकांचे महत्वपूर्ण लेखन प्रथम प्रकाशित झाले ते 'प्रभाकर', 'इंदुप्रकाश', 'सुधाकर', 'काळ' या सारख्या वृत्तपत्रांतून. या लेखकांनी आपले विचार जनमानसापर्यन्त पोहचविण्यासाठी त्यांच्यात विचार जागृती करण्यासाठी ग्रंथलेखनाचा मार्ग अनुसरला असला तरी विचार जागृतीचे सातत्य कायम टिकविण्यासाठी नियतकालिके, वृत्तपत्रे अधिक उपयुक्त ठरतात हे नि:संशय खरे आहे.

मुद्रण कलेचा आश्रय भारतातील इतर सर्व भाषांप्रमाणे मराठीनेही घेतला. महाराष्ट्रातही मुद्रण व्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. मराठी भाषेत सुरुवातीस जी वृत्तपत्रे किंवा बातमीपत्रे निघाली त्यांचा उद्देश्य मात्र केवळ बातम्या प्रसारित करणे एवढाच मर्यादित नव्हता हि वृत्तपत्रे दररोज देशाच्या विविध भागात घडणाऱ्या घटनांची माहिती देत असली तरी वृत्त - प्रकटन हा गौण भाग होता. बातमीपेक्षा ज्ञानप्रसार, मतप्रकटन, आणि विचार जागृती हि त्याची प्रमुख भूमिका होती.

सामाजिक सुधारणा, त्यासाठी समाजात विचार जागृती घडवून आणणे. सामाजिक समस्येच्या चळवळी घडवून आणणे आणि त्याद्वारे हळूहळू आपले गेलेले स्वराज्य परत मिळविणे हे या नियतकालिकाचे, वृत्तपत्रांचे उद्दिष्ट होते हि नियतकालिके अशी कांही ध्येय, स्वप्ने उराशी बाळगुन जन्मास आली.[१]

वृत्तपत्रांतून सातत्याने प्रसारीत होणाऱ्या वैचारिक आणि ललित लेखनाने महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात अनेक आंदोलने निर्माण केली ही आंदोलने विशेषात: सामाजिक ,धार्मिक आणि राजकीय सुधारणांच्या बाबतीत मराठी मनात निर्माण केली. ही आंदोलने विशेषात: सामाजिक,धार्मिक आणि राजकीय सुधारणांच्या बाबतीत मराठी मनात निर्माण झाली. सुधारणे विषयीच्या अनुकूल प्रतिकूल मतांचे प्रवाह वाहून महाराष्ट्रात विचारमंथन घडविण्यास नियतकालिके व वृत्तपत्रेच अधिक कारणीभूत ठरली.[१०]

सारांश --

प्रचलित सामाजिक,धार्मिक,शैक्षणिक आणि राजकीय विषयांच्या संदर्भात उपयुक्त,बोधप्रद आणि विचारप्रवर्तक लेखन प्रकाशित करून समाजाला बोध करणे, ज्ञान प्रसार करणे व त्याद्वारा विचार जागृती करणे हे वृत्तपत्रांचे विशेष आणि महत्वपूर्ण कार्य होय. वृत्तपत्रांच्या या कार्यामुळे समाजाची मने जागृत होऊन पुरोगामी विचाराकडे मोठ्या जिद्दीने वळलेली आहेत. वृत्तपत्रांच्या कार्यामुळे लोकशाहीचा पगडा ग्रामीण व शहरी लोकांवर बसला .वृत्तपत्रांने माणसाला कसे वागावे व आपण आपल्या देशासाठी,बांधवांसाठी काय करावे व कसे वागावे हे शिकविले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात समाजात सर्व बाजूंनी बदल घडवून आलेला आहे. लोकजीवनाला उपयोगी असे कार्य वृत्तपत्रांनी केले आहे.

मराठी वृत्तपत्रांचा इतिहास --

मराठी वृत्तपत्रांचा प्रारंभ प्रथम मुंबई शहरात झाला. व तो ही पहिले गुजराती वृत्तपत्र मुंबईत निघून दहा वर्षांचा काळ लोटल्यावर झाला. गुजराती पत्रांना मुंबईतही वाचक वर्ग होता. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शिक्षण व ग्रंथनिर्मिती याबाबतीत गुजराती हिंदू फारसे पुढे नव्हते. गुजराती भाषा मराठीच्या पावलावर पाऊल ठेवून चालली होती. मुंबईत वृत्तपत्रासारख्या साधनांचा जन्म होण्यास परिस्थिती अनुकूल होती. वृत्तपत्रांच्या निर्मितीसाठी छापखान्याची आवश्यकता होती व तो मुंबईतच उपलब्ध होता.

मुंबईत गुजराती वृत्तपत्र निघाल्यावर मराठी वृत्तपत्र निघाले. मुंबईत इंग्रजी वृत्तपत्रे निघाल्यावर सुमारे चाळीस, पंचेचाळीस वर्षांनी गुजराती वृत्तपत्र निघाले. त्यानंतर दहा-बारा वर्षांनी मराठी वृत्तपत्र निघाले. वृत्तपत्रांसारखी साधने आपण निर्माण करावी अशी इच्छा मुंबईतील मराठी समाजात होऊ शकली ती नवीन शिक्षणाने दृष्टी व्यापक झाल्यानंतर सामाजिक प्रबोधनाला प्रारंभ झाला तो पाश्चात्य विद्येचा संस्कार लाभल्यावर. या प्रबोधनाला मुंबई शहराच्या सार्वजनिक स्वरूपाची व्यापकता होती. प्रबोधनाच्या कार्यात हिंदु-मुसलमान, पारशी, ख्रिस्ती इ.अनेक जातिधर्मातील अशी एक व्यापक सामाजिक दृष्टी होती. १८७० पर्यन्त महाराष्ट्राच्या शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या चळवळीचे मुंबई हेच केन्द्र राहिले.[११]

मुद्रणाचे महत्व समजल्यामुळे त्यातून ग्रंथनिर्मिती प्रमाणे वृत्तपत्रे हेही ज्ञानप्रसाराचे एक अमोघ साधन आहे याची जाणीव निर्माण झाली होती. इंग्रजी, बंगाली वृत्तपत्रांची माहिती होती. त्यांचे स्वरूप व कार्य लक्षात आल्यामुळे बाळशास्त्री जांभेकरांसारख्या विद्वानाला इंग्रजी, बंगाली या दोन्ही भाषांची ओळख झाली. मुंबईत आधीच सुरू झालेली गुजराती वृत्तपत्रे समोर होतीच. त्यामुळे मराठी भाषिक लोक वृत्तपत्राकडे वळले होते. प्रबोधनामुळे जी नवी दृष्टी लाभली तीचा लाभ इतरांनाही व्हावा म्हणून लोक संवादाचे वृत्त-पत्र हे साधन अस्तित्वात आले.`[१२] लोकस्थिती, धर्मरीती, आणि उपयोगी फेरफार घडवून आणणे` हे वृत्तपत्राचे कर्तव्य आहे असे मानले जाऊ लागले.

## `दर्पण` चा उषा: काल --

६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी `दर्पण` हे पाक्षिक प्रकाशित केले. तत्कालीन प्रमुख आठ भाषा व अनेक शास्त्रांत पारंगत असलेले बाळशास्त्री वयाच्या १९व्या वर्षी अध्यापक बनले `एडिंबरो रिव्हियू` व रॉयल एशियाटिक सोसायटी` सारख्या नामवंत पत्रिकातून त्यांचे शोध-निबंध प्रसिध्द झाले.[१३]

शुध्दी चळवळ , विधवा पुनर्विवाह यासारख्या सामाजिक चळवळींच्या बाजूने त्यांनी विचारमंथन घडवले. दर पंधरा दिवसांनी छापावयाचे पुस्तक ,कागद, किंमत दर $\frac{1}{2}$ महिन्यात रू. ६ असा ` दर्पण ` च्या पहिल्या अंकावर उल्लेख आढळतो. संपादक म्हणून बाळशास्त्री जांभेकर यांचा स्पष्ट उल्लेख नसला तरी दादोबांचे आत्मचरित्र व तत्कालीन कागदपत्रे यावरून ` दर्पण ` कार जांभेकर होते, असे सिध्द करण्यात आले आहे. निम्मा मजकूर इंग्रजी व निम्मा मराठी अशी डेमी आकाराची ८ पाने, प्रत्येकी दोन कॉलम मजकुराने युक्त असत. भारतीय जनतेच्या आशाआकांक्षा प्रतिबिंबित करण्यावर ` दर्पण ` चा भर होता. शिवाय भारतीय जनतेची भूमिका इंग्रजांना कळावी हा ही प्रधान हेतू होता. सरकार व प्रजाजन यातील दुवा म्हणून कार्य करावे या हेतूने दुहेरी संवादाचे उद्दिष्ट उराशी बाळगून ` दर्पण ` तील इंग्रजी मजकूराची बाजू स्वत: बाळशास्त्री पाहात तर मराठी बाजू सांभाळताना भाऊ महाजन यांचे त्यांना सहकार्य लाभत असावे.

` दर्पणा ` तील दर्जा उच्च स्वरूपाचा असे. तत्कालीन गव्हर्नर जेम्स कार्नाक यांनी ` जस्टिस ऑफ द पीस ` असा किताब देऊन बाळशास्त्रींचा गौरव केला. ` बॉम्बे नेटिव्ह ऑब्झर्वर ` या तत्कालीन मिशनरी वृत्तपत्राने ` दर्पण ` तील प्रतिपादन समतोल असल्याचे नमूद केले आहे. [१४] ` दर्पण ` मध्ये सर्वसमावेशक विविध विषयांचे प्रतिबिंब उमटविलेले आढळते. बाळशास्त्री जांभेकर ख्रिस्ती मिशनऱ्यांवर टीका करून थांबले नाहीत तर त्यांनी जातीभेद निर्मूलन, स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह, शुध्दी चळवळ यांचा हिरीरीने पुरस्कार केला. ` दर्पण ` चा पहिला अंक मेसेंजर प्रेस,काळबादेवी येथे,कावसजी करसेटजी यांनी रघुनाथ हरिश्चंद्रजी यासाठी छापला. नंतर जगन्नाथजी यांनी ` दर्पण ` बेललेन येथे प्रसिध्द केले. प्रथम पाक्षिक व ४ मे १८३२ पासून ` दर्पण ` साप्ताहिक स्वरूपात निघत असे. २४ रू.वार्षिक वर्गणी व ३०० वर्गणीदारांचा संच असलेला ` दर्पण ` चा प्रपंच २५ जून १८४० मध्ये थांबला. ` लेबर केस ` मध्ये अडचणीत येऊन ` दर्पण ` चे प्रकाशन थांबले. राजकिय उणिवा प्रसारित

करणे आणि नव्या सामाजिक बदलांची तयारी म्हणून जनमनाची मशागत करणे यासाठी `दर्पण` ने अल्पावधीत उल्लेखनीय कार्य केले. व्यवसाय म्हणून नव्हे तर ध्येयवादाने प्रेरित होऊन पत्रकारिता करण्याची परंपरा `दर्पण` ने सुरु केली. मराठी वृत्तपत्र सृष्टीचे बीजांकूर म्हणून `दर्पण` चे कार्य महत्वाचे ठरते. गुरु-शिष्यांची परंपरा `दर्पण` ने महाराष्ट्रात सुरु केली.[१५]

प्रभाकर --

`प्रभाकर` हे पत्र सुरु होण्यापूर्वी इ.स.१८३५ मध्ये आनंदराव विठोबा यानी `पुनावार्तिका` या नावाने कंपनीच्या संचालकांकडे परवाना मागितला होता. हे वृत्तपत्र प्रसिध्द झाले किंवा नाही याचा पुरावा लाभत नाही. यानंतरचा लक्षणीय प्रयत्न म्हणून `मुंबई अखबार` या परिपूर्ण मराठी नियतकालिकाचा उल्लेख करावा लागेल. हे पत्र त्या काळात `दर्पण` शी स्पर्धा करीत असावे. परंतु हे वृत्तपत्र दीर्घकाळ चालले नसावे असे वाटते. ३ जुलै १८४० रोजी गणपत कृष्णाजी यांनी युनायटेड सर्व्हिस गॅझेट प्रेस, मेसबोट लेन, मुंबई या पत्राचा पहिला अंक प्रसिध्द केला. `दर्पण` चे प्रकाशन थांबल्यावर `युनायटेड सर्व्हिस गॅझेट` या इंग्रजी पत्राने त्याची जागा घेतली तर मराठी पत्राची जागा `मुंबई अखबार` ने घेतली व वाचकांच्या अभिरुचीत खंड पडु दिला नाही. २४ ऑक्टोबर १८४१ रोजी गोविंद विठ्ठल कुंटे ऊर्फ भाऊ महाजन ( १८१५-९०) यांनी ११।९ आकाराचे `प्रभाकर` हे वृत्त गणपत कृष्णाजी छापखान्यात छापून प्रसिध्द केले. १७ जुलै १८४२ पासून ते स्वत:च्या मुद्रणालयात छापले जाऊ लागले.[१६]

पूर्ण वेळ पत्रकारीतेस वाहून घेऊन कार्य करणारे भाऊ महाजन हे मराठीतील पहिले पत्रकार. सरकारची नोकरी न पत्करता निर्भिड व नि:पक्षपातीपणे लोक शिक्षण करता यावे म्हणून त्यांनी पत्रकारितेचा मार्ग अनुसरला. तत्कालीन इंग्रजी, गुजराती वृत्तपत्रांचे उतारे सारांशरूपाने `प्रभाकर` मध्ये येत असत. फ्रेंचाच्या बंडाचा इतिहास, फ्रेंचांची क्रांती, इंग्रजी राज्यपध्दती, साताराचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचा स्वातंत्र्यासाठी संघर्ष इत्यादी

लेखांवरून `प्रभाकर` च्या संपादकांची प्रगल्भ अशी राजकीय दृष्टी प्रतीत होते. इंग्रजांशी शिखांनी दिलेली झुंज, अफगाणिस्थानातील झटापटीत या बाबतच्या बातम्यांवरून हेच सिध्द होते. पाश्चात्यांचे अंधानुकरण करावयाचे नाही किंवा स्वसंस्कृतीचा वृथा अभिमान बाळगावयाचा नाही असे भाऊंचे समतोल धोरण होते. त्यानुसार आपली लेखणी ते चालवत असत. एकीकडे मिशनऱ्यांच्या उपद्व्यापी कारवायांवर ते कोरडे ओढतात, तर दुसरीकडे विष्णु बुवा ब्रम्हचारींच्या विक्षिप्तपणावर टीका करतात. `लोकहितवादी` गोपाळ हरी देशमुख यांची `शतपत्रे` छापण्याचे धाडस केवळ भाऊ महाजन करु शकले.[१७]

लोकमान्य टिळक व आगरकर यांचा राजकीय परखडपणा व सामाजिक द्रष्टेपणा याचा प्रकट आविष्कार त्या दोघांच्या पूर्वी भाऊ महाजन यांच्या व्यक्तिमत्वातच फक्त आढळतो. `काळाचा प्रवाह सर्वस्वी प्रतिकूल आहे. साधन - सामग्रीचे दुर्भिक्ष्य आहे ... अशा निराशामय परिस्थितीत लोकहितावर दृष्टी ठेवून ती तडीस नेणारे खंबीर कार्यकर्ते फारच विरळ अशा लोकोत्तर कार्यकर्त्यात भाऊ महाजन यांची गणना होते` अशा शब्दात प्रा.गं.बा.सरदार, त्यांच्या कार्याचा गौरव करतात. बाबा पद्मनजींच्या मते` ... हे विद्वान गृहस्थ पहिल्या प्रतीचे मराठी जाणणारे होते...` दत्तो वामन पोतदार यांच्या मते` विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या` निबंधमाले` ने मराठी वाचणाऱ्यास चटक लाविली तशीच त्याकाळी` प्रभाकर ` व ` धूमकेतू ` या पत्रांनीही लाविली` सारांश काय तर भाऊनी जांभेकरांपेक्षा एक पाऊल पुढे टाकले व पत्रकारिता प्रगत अवस्थेत नेली.[१८]

ज्ञानप्रकाश --

१२ फेब्रुवारी १८४९ रोजी` ज्ञानप्रकाश` या वृत्तपत्रास प्रारंभ झाला. आणि पुण्यात खऱ्या अर्थाने तेव्हा पासून मराठी वृत्तपत्रसृष्टीस बळकटी प्राप्त झाली. या ज्ञानप्रकाश वृत्तपत्राचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. हे पत्र इंग्रजी व मराठी या दोन भाषामध्ये छापले गेले. येथूनच खऱ्या अर्थाने वृत्त पत्राचे नवीन युग सुरु झाले असे म्हणता येईल. साप्ताहिक` ज्ञानप्रकाश` वर` सत्य,

सौख्य व ज्ञान` या ध्येयवादाचे ब्रीद वाक्य या स्वरुपात नोंद आढळते. द्वि साप्ताहिक ज्ञानप्रकाशात` वाङ्मय, राजकारण, व्यापार व वार्ता यांना वाहिलेले पत्र` असे इंग्रजीत छापलेले आढळते. १८९५ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनानंतर` ज्ञानप्रकाश` ने राष्ट्रीय मताचा पुरस्कार केला. कृष्णाजी त्रिंबक रानडे हे` ज्ञानप्रकाश` चे संस्थापक संपादक. त्यानंतर बाबा गोखले, दामोदर गोखले, सीतारामपंत चिपळूणकर आदींची नावे प्रकटतात. प्रारंभीच्या लेखकांत ` लोकहितवादी` गोपाळ हरी देशमुख, केरो ल.छत्रे, महादेवशास्त्री कोल्हटकर, भवाळकर, मोरे, ढमढेरे आदींची नावे आढळतात तर नंतरच्या काळात न्या.म.गो.रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळकृष्ण गोखले, प्रा.भानु यांची नावे आढळतात. १५ ऑगस्ट १९०४ पासून` ज्ञानप्रकाश` हे दैनिक बनले.

ह.ना.आपटे, वा.गो.आपटे व सी.के.दामले हे त्यांच्या संपादक मंडळावर आले.` भारत सेवक समाजा`ने` ज्ञानप्रकाश` ची मालकी विकत घेतली. गो.कृ. देवधर, बापू द्रविड, अ.वि.पटवर्धन, ह.ग.लिमये, शंकरराव गोखले यांनी संपादक म्हणून काम पाहिले. १०३ वर्षे चालवून १ जानेवारी १९५१ रोजी ` ज्ञानप्रकाश` चे प्रकाशन थांबले. महाराष्ट्राच्या १०० वर्षांच्या इतिहासात` ज्ञानप्रकाश` चे वैशिष्ट्यपूर्ण स्वरुपाचे कार्य आहे. [१९]

इंदुप्रकाश --

१८६२ साली पदवीधरांची पहिली पिढी बाहेर पडली. मुंबईतील नवसुशिक्षितांमधील जागृतीच्या प्रवाहातून` इंदुप्रकाश` चा १८६२ मध्ये जन्म झाला. या पत्राचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यास लाभलेला विद्वान प्रगमनशील लेखक वर्ग.

संस्था स्थापने पासून १८२४ साली ते बंद होईपर्यन्त अनेक विद्वानांनी या पत्रास हातभार लावला. पुण्यातील` ज्ञानप्रकाश` वगळता महाराष्ट्रात प्रभावी असे समाजसुधारकी वृत्तपत्र नव्हते. शिवाय नव्या प्रबोधनवादी वृत्तपत्रांची गरज ही भासत होती. अँग्लो-इंडियन वृत्तपत्रे नेमस्त धोरण स्वीकारीत तेव्हा राजधानीत मराठीतील वृत्तपत्राची आवश्यकता या सुधारकांना सतत भासत होती. वृत्तपत्रांचे

ज्ञानाच्या प्रसारात महत्वाचे कार्य लक्षात घेता लोकहितवादींनीही `इंदुप्रकाश` प्रसिध्द व्हावा या साठी बरेच प्रयत्न केले होते. शिवाय न्या.म.गो.रानडे, ज.स.गाडगीळ यांचे प्रयत्नही उपयुक्त ठरले.[२०]

अरविंद घोष, न्या.रानडे, न्या.तेलंग, परशुरामशास्त्री रानडे आदींचे लेखनही `इंदुप्रकाशा`त प्रकटत असे. प्रा.न.र.फाटक यांचे संपादनकौशल्यही प्रारंभी याच वृत्तपत्रातून चमकलेले पहावयास मिळते. जहाल विचारांच्या भोवऱ्यात अनेक नेमस्त-जहाल वृत्तपत्रे निष्प्रभ ठरली. इ.स.१९२० मध्ये `इंदुप्रकाश` `लोकमान्य` मध्ये विलीन झाला.

`दीन बंधु`
------

पुरोहितांचे वर्चस्व झुगारुन देऊन महाराष्ट्रात बहुजन समाजाच्या उन्नतीचे पहिले प्रयत्न महात्मा जोतिराव फुले यांनी केले. ते काळाच्या पुढे असलेले द्रष्टे युगपुरुष व शेतकऱ्यांच्या सुख दु:खाची वास्तव जाण असलेले भारतातील पहिले `किसान महात्मा` होते. १८७३ साली `सत्यशोधक समाजा`ची त्यांनी संस्था स्थापन केली. या तत्वज्ञानाचा पुरस्कार करण्यासाठी त्यांनी कृष्णराव पांडुरंग भालेकर यांच्या संपादकत्वाखाली `दीनबंधु` साप्ताहिक पत्राची स्थापना इ.स.१८७७ मध्ये केली.[२१]

ब्राह्मणी वर्चस्वा विरुध्द प्रहार करणारे `दीनबंधु` हे महाराष्ट्रातील पहिलेच वृत्तपत्र. स्वत: म.जोतीराव फुले, ग्यानोबा कृष्णाजी ससाणे, नारायण मेघाजी लोखंडे, गणपत सखाराम पाटील इ.चे लेखन या वृत्तपत्रात प्रकटत असे. या दशकातील आणखी एक महत्वाचे वैशिष्टय म्हणजे वृत्तपत्रांचा प्रसार मुंबई व पुण्याच्या बाहेर होण्यास प्रारंभ झाला. `बेळगाव समाचार` १८४६ `सूर्योदय` व `नाशिक वृत्त` १८६३, `खानदेश वैभव` १८६७-६८ `ज्ञानसागर कोल्हापूर` १८६१ `सत्यशोधक रत्नागिरी` १८७१, `मार्यादी धुळे` १८७६ `कल्पतरु`, `सोलापूर`, `पंढरी-संदेश` अशी अनेक वृत्त पत्रे या काळात प्रसिध्द होऊ लागली.

` केसरी `

` देशस्थिती, देशभाषेतील व विलायतेतील राजकारण या विषयांच्या संबंधाने जसे यथास्थित उद्घाटन व्हावयास हवे होते तसे झाले नाही ही उणीव भरून काढण्यासाठी सहा व्यक्तींच्या सह्यांनी `केसरी` ची योजना मांडण्यात आली.[२२]

रा.गो.कानडे -- यांनी `निबंधमाले` तून `केसरी` चा उदय झाला असे मत प्रतिपादन केले आहे. तर चलपतीराव यांच्या मते ( अमृतबझार पत्रिके` तून ` केसरी` चा उदय झाला व त्याच धर्तीवर ` केसरी` चे कार्य सुरू झाले, असे विवेचन त्यांनी केले आहे. तत्कालीन वृत्तपत्रापेक्षा` केसरी` ला निश्चितच स्वतंत्र दृष्टी होती. ` केसरी` पूर्व वृत्तपत्रे इ.स.१८३२-१८८० या काळात सरकार व प्रजायांचे व्यासपीठ म्हणून कार्य करित. सरकारच्या अस्तित्वाला आव्हान देण्याचे सामर्थ्य या वृत्तपत्रांत नव्हते त्यामुळे केसरीची स्वातंत्र्याची सिंह गर्जना या पार्श्वभूमीवर विशेष महत्वाची वाटते` ... तुमचे अंत:करण देशाकरिता जळते आहे ना मग तुम्ही लिहिलेच पाहिजे....` असा लोकमान्य टिळकांचा विश्वास प्रखड राष्ट्र भक्ती होती. इ.स.१८८१ च्या जानेवारीच्या पहिल्या मंगळवारी ` केसरी` चा पहिला अंक प्रसिध्द झाला. विष्णुशास्त्री,आगरकर व टिळक यांच्या लेखनाची त्यात सरमिसळ आढळते, वृत्तपत्र हे संघ कार्य (Team Work ) आहे. या दृष्टीने ` केसरी` चा व्याप प्रारंभापासूनच मोठा होता. इ.स.१८८७ पर्यन्त पहिली ६-७ वर्षे गो.ग.आगरकर हेच` केसरी` चे प्रकाशक व संपादक होते. या काळातील लेखनाला आगरकरांच्या विचारांचा विशेष प्रकर्षाने प्रभाव जाणवतो. त्यातील लेखनाचा चिकित्सक अभ्यास करून डॉ.य.दि.फडके यांनी या काळातील ` केसरी` हा` आगरकरांचा केसरी` असल्याचे साधार मत प्रतिपादन केले आहे.

` केसरी` लेख संग्रहा` वर दृष्टिक्षेप टाकल्यास टिळकांच्या लेखनाचे साक्षेपी स्वरूप स्पष्ट होते. टिळक सदैव राजनीतीच्या रणभूमीवर पाय रोवून असत, त्यामुळे त्यांच्या लेखनात राजनीतीचे आकलन प्रकर्षाने घडते. त्या शिवाय

अर्थ,धर्म,राजकारण,शिक्षण,संशोधन,चरित्र व वाङ्‌मय इ. विषयांचेही साक्षेपी दर्शन घडते. आपल्या घणाघाती वक्तृत्वाप्रमाणे ते विचारांचे द्वंद्वही खंडनमंडण पध्दतीने प्रतिबिंबित करतात. एखाद्या विषयावर एकांगीपणे न लिहिता दुसरी बाजूही विचारात घेऊन प्रकटणारे त्यांचे विवेचन साक्षेपी स्वरूपाचे आढळते. ' प्रिन्सिपॉल,पशुपाल की शिशुपाल ' , ' नवी विटी नवे राज्य ', ' उजाडले पण सूर्य कोठे आहे ? ' , ' सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ? ' , ' जनाब दिल्ली बहोत दूर है ' , ' पुनश्च हरि ॐ ' असे त्यांच्या अग्रलेखाचे मथळेच त्यांच्या विवेचनातील मार्मिक उपरोध व परखडपणाचे द्योतक आहेत.उपमा नि अलंकारांच्या फुलो-यात अडकून ते विचारांचा प्रवाह खंडित होऊन देत नाहीत. प्रवाही विवेचनाला मापक विनोद व अलंकाराची ते जोड देतात. राजकीय जीवनातील चढउतार व पर्यायाने लेखनातील कायदेशीर आव्हानांचा खडतरपणा टिळकांनीही भरपूर सोसला. राष्ट्रीय चळवळीचा जोम वाढत गेला तसे ' केसरी ' चे खपाचे आकडेही वेगाने वाढत राहिले. १९०४ साली ' केसरी ' ने २० हजाराहून अधिक प्रमाणात खपाचा आकडा ओलांडला होता.

१९०४ ते १९२० या काळात टिळकांच्या कर्तृत्वाने ' केसरी ' ला राष्ट्रीय महत्व प्राप्त झाले. मरगळ दूर करून,मराठी वृत्तपत्रसृष्टी सचेतन करून,वृत्तपत्रे खेड्यापर्यन्त नेऊन पोचविण्याचे कार्य ' केसरी ' ने केले. महाराष्ट्राच्या कानाकोप-यातील वाचकास जागरूक बनवून त्याला राष्ट्रीय दृष्टी देण्याचे कार्य टिळकांनी केले. कृष्णबिहारी मिश्र यांनी ' हिन्दी पत्रकारितेमधील टिळक युग ' असा या काळाचा उल्लेख केला आहे.

न. चिं.केळकर, कृ.प्र.खाडिलकर, ग. वि.केतकर इ. संपादकांची परंपरा ' केसरी ' ने पुढे आणली. साप्ताहिक, द्विसाप्ताहिक व दैनिक असा प्रवास करून ' केसरी ' ने शताब्दी ओलांडली आहे. ' केसरी ' च्या शताब्दीचा इतिहास म्हणजे महाराष्ट्राच्या राजकीय बदलाचा, स्थूल स्वरूपाने क्रांतिकारक इतिहास होय.[33]

`सुधारक`

`केसरी` विरुध्द `सुधारक` १८८८-९५ हा संघर्ष टिळक-आगरकरांच्या विचारांचा संघर्ष होता. `जर अन्याय दिसेल तर बोलून दाखवणार` अशी अन्यायाची चीड असलेले आगरकर प्रगल्भ समाजसुधारक होते. `जर अन्याय दिसेल तर बोलून दाखविणार, मग तसे करताना माझ्याजवळ आपपरभाव दिसणार नाही. योग्य ते बोलेन व योग्य तेच लिहीन ...` ही त्यांची दृष्टी होती. `केसरी` च्या धोरणास चिकटून राहून उपयोगाचे नाही हे लक्षात घेऊन गोपाळ कृष्ण गोखले यांच्या मदतीने पुढे त्यांनी `सुधारक` पत्र चालविले. आगरकरांनी केवळ सामाजिक सुधारणाच सांगितल्या नाहीत तर त्यांना प्रखर राजकीय व आर्थिक दृष्टी ही होती.

महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांचे व्यापक मन तयार करण्याची कामगिरी `सुधारका` ने केली. आचार्य जावडेकरांनी `उदारमतवादी क्रांतिकारक` या शब्दात त्यांचे सार्थ वर्णन केले आहे. आगरकर व लोकमान्य टिळक यांच्या कार्यात एकसूत्रता असती व राजकीय स्वातंत्र्य नि समाजसुधारणा यांचा एकसंघ उठाव झाला असता तर महाराष्ट्र आणखी पन्नास वर्षे पुढे सरकला असता. [२४]

नवा काळ

१९२३ साली कॉंग्रेसच्या धोरणाचा पुरस्कार करण्यासाठी यंदे शेटजींनी प्रा.न.र.फाटक यांच्या सहकार्याने `नवा काळ` दैनिक सुरू केले. काकासाहेब खाडिलकरांच्या संपादन कौशल्याने मुंबईत `नवाकाळ` स्थिरावला. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही या वृत्तपत्राचे मोलाचे कार्य नोंदवण्यासारखे ठरले. याच काळात मुंबईत `प्रभात` पत्राचा उदय झाला होता. याच काळात काकासाहेब लिमये यांच्या मार्गदर्शनाखाली `ज्ञानप्रकाश` मुंबईत जाऊ लागला. [२५]

सकाळ

१ जानेवारी १९३२ रोजी नारायण भिकाजी तथा नानासाहेब

परुळेकर यांनी ' सकाळ ' चा पहिला अंक प्रसिध्द केला. दै.वृत्तपत्रांना एक नवी दिशा देण्याचे कार्य ' सकाळ ' पत्राने व त्याचे संस्थापक नारायण तथा नानासाहेब परुळेकर यांनी केले. अच्युतराव कोल्हटकरांनी वृत्तपत्र सर्वसामान्य माणसापर्यन्त पोचवून ते त्याला विकत घेऊन वाचायला लावले,पण नाना - साहेबांनी वृत्तपत्राचा वाचकवर्ग वाढवला. जनताभिमुखी धोरण ठेवून खेड्यापाड्यातल्या घटनांचे सूत्र नागरी घटकांशी जोडण्याचा उपक्रमही ' सकाळ ' ने केला. वृत्तपत्राची जुनी चाकोरी साफ मोडून दैनिकाचा चेहरा मोहरा नाना - साहेबांनी बदलून टाकला. बातमी, ताजी बातमी,प्रत्यक्ष जागेवर जाऊन मिळवलेली अव्वल बातमी हा त्यांनी दैनिकाचा केन्द्र बिंदू केला. महाराष्ट्रात बहुजन समाज कॉंग्रेसमध्ये येऊन राष्ट्रीय प्रवाहात सामील झाला. नेमक्या त्याचवेळी निघालेल्या ' सकाळ ' पत्राचे वैशिष्टयही तेवढेच महत्वाचे ठरते. ' सकाळ ' चे प्रथम पासून ब्रीद आहे. त्याच प्रमाणे बातम्यांच्या विषयांचे रूढ संकेत मोडून ' सकाळ ' ने त्यांची व्याप्ती किती तरी वाढविली. राजकीय हालचाली,सभातील भाषणे, या पलीकडे सामान्य बातमीची कक्षा जात नसे ' सकाळ ' ने ती खूप रुंद केली. लोकांच्या चिंतेचे,चेवैचे,आशाआकांक्षांचे जे जे विषय ते ते सर्व बातमीचे विषय ' सकाळ ' ने केले. यामुळे बातम्यांत विविधता आली आणि सामान्य माणसाला वृत्तपत्र जिव्हाळ्याचे वाटू लागले.[२६]

' पुढारी ' ची स्थापना --

राजर्षि शाहू छत्रपतींच्या काळात कोल्हापूर पुरोगामी सामाजिक सुधारणांचे आणि बहुजन समाजाच्या शैक्षणिक,सांस्कृतिक उत्थानाचे केन्द्र बनले होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभी श्रीपतराव शिंदे यांचे ' विजयी मराठा ' हे वृत्तपत्र कोल्हापरात व्यवस्थित चालत होते. तथापि श्रीपतराव शिंदे यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे कालांतराने ' विजय मराठा ' बंद पडले. त्यामुळे बहुजन समाजासाठी एखाद्या पत्राची गरज तीव्रतेने वाटू लागली, होती. कोल्हापूरातील ' मराठा नवजीवन ' व ' सेवक ' ही एकाच विचारसरणीची दोन पत्रे चालवून अपव्यय करणे कितपत युक्त ,असा ही विचार पुढे येत होता. या दोन पत्रांचे

एकीकरण करावे अशा विचाराला त्यामुळे चालना मिळाली. परंतु दोन्ही पत्रे आर्थिकदृष्ट्या सुस्थिर नसल्याने ती एकत्र येऊनही त्यापासून फारसा फायदा होण्याची शक्यता नव्हती. यामुळे एकिकरणाची कल्पना मूर्त स्वरूपात येऊ शकली नाही. परंतु वाढत्या आकांक्षा आणि वाढत्या भावना यांचे लोण अखिल करवीर इलाख्यातील व इतरत्र विखुरलेल्या बहुजन समाजात पोहचविण्यास कोल्हापूरात एका भारदस्त,कार्यक्षम व ध्येयनिष्ठ अशा वृत्तपत्राची आवश्यकता अत्यंत तीव्रतेने जाणवत होती ही गरज जाणवणाऱ्या मंडळीत रा.ब.दत्तोबा भोसले, डी.आर.भोसले,एस.एस.भोसले,जी.डी.पाटील, वकील, पी.ए.राणे, इत्यादी लोक प्रमुख होते. कोल्हापूर दरबाराचा उघड नाही तर अप्रत्यक्ष पाठिंबा या मंडळींना होता. त्यामुळे जरूर तेवढ्या पैशाची व्यवस्था करणेही अशक्य नव्हते. या मंडळींनी `कोल्हापूर न्यूज पेपर्स असोसिएशन` नावाची संस्था १९३७ सालच्या एप्रिल महिन्यात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर स्थापना केली. एक मोठ्या स्वरूपाचे वृत्तपत्र सुरू करावे असे त्यांचे उद्दिष्ट होते. रावसाहेब डी.आर.भोसले यांचे` मराठा नवजीवन` व गणपतराव जाधव व राजकवी शंकरराव भोसले यांचे` सेवक` ही दोन पत्रे एकत्र येऊन` पुढारी` चा जन्म झाला.` पुढारी` प्रारंभी साप्ताहिक पत्र होते.[२७]

मवाळ पक्षाचे पुढारी सर चिंतामणी यांच्या संपादकत्वाखाली अलाहाबाद येथे` लीडर` प्रकाशित होत होते. त्याचेच भाषांतर करून `पुढारी` हे नाव नव्या साप्ताहिकास देण्याचे ठरले. अशा प्रकारे कोल्हापूरात सामाजिक जाणीवेने सुरू होणाऱ्या या नव्या पत्राचे` पुढारी` असे नामाभिधान झाले. इतके झाले तरी संस्थेच्या भांडवलाची जिम्मेदारी कोणीतरी पत्करावयास हवी होती रावबहादुर डी.आर.भोसले यांनी ती पत्करली. त्यानी` क्षत्रिय मराठा मंडळ` या संस्थेच्या वतीने काही कर्जाऊ भांडवलाचा पुरवठा केला. तसेच गणपतराव जाधव यांचे बाल मित्र बावडा जहागिरीचे अधिपती श्रीमंत भाऊसाहेब पंत अमात्य यानीही त्यात भागीदारी केली.` दि कोल्हापूर न्युजपेपर्स असोसिशन` ही उपाधी लावून घेतली आणि या संस्थेच्या वतीने `पुढारी` चा पहिला अंक १३ मे १९३७ रोजी प्रसिध्द झाला. वी.टी.पाटील हे` पुढारी` चे

पहिले संपादक, तर जी.डी.पाटील, वकील हे प्रकाशक व शं.बा.भोसले मुद्रक होते. गणपतराव जाधव यांचे नाव कोठेच छापलेले दिसत नसले तरी संपादकीय जबाबदारी त्यांच्यावरच होती.वृत्तपत्र चालविण्याचा त्यांचा अनुभव मोठा असल्याने ' पुढारी ' आर्थिक दृष्टया यशस्वी करण्याची जबाबदारी त्यांच्यावरच होती.[२८]

साप्ताहिक ' पुढारी ' ने कोल्हापूरच्या वृत्तपत्रसृष्टीत वैशिष्टयपूर्ण स्थान निर्माण केले. वृत्तपत्रसृष्टीला दर्जा मिळवून दिला. ' पुढारी ' च्या सजावटीपासून अंतरंगापर्यन्त क्रांतिकारक बदल दिसून येतो. हा बदल कोणत्याही जिल्हापत्रात अभावानेच त्याकाळी दिसला असेल. साप्ताहिक ' पुढारी ' ने अगदी पहिल्या अंकापासून मुखपृष्ठावर आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या थोर चित्रकारांच्या अविस्मरणीय कलाकृतींची चित्रे देण्यास सुरुवात केली.तसेच आपल्या वाचकांना आठवड्यातील बातम्या,काही ठळक घटना यांची माहिती मिळावी यासाठी ' दुनियेतील विविध घडामोडी ' हे सदर ठेवले होते. ' पुढारी ' त पहिल्या अंकापासून व्यंगचित्र देण्याचीही पध्दत सुरू होती ही व्यंगचित्रे कागलचे डॉ.बाबुराव घाटगे काढीत असत.[२९]

दैनिकाच्या दृष्टीने ताज्या बातम्या हे महत्वाचे अंग असते. खास ताराद्वारा मिळविलेल्या ताज्या बातम्या,वार्तापत्रे,चित्रे,सजावट व खुसखुशीत अग्रलेख ही ' पुढारी ' ची वैशिष्टये ठरली. ' पुढारी ' या मुळे लोकप्रिय ठरू लागला. १ जानेवारी १९३९ पासून ' पुढारी ' दैनिक स्वरुपात प्रसिध्द होऊ लागला. ' पुढारी ' दैनिक झाल्यावर व्ही.टी.पाटील हे संपादकीय जबाबदारीतून मोकळे झाले व संपादक म्हणून गणपतराव जाधव यांचे नाव २७ जानेवारी १९३९ पासून पत्रावर झळकू लागले.तथापि जोडीला एखादा पदवीधर असावा म्हणून श्री.डी.एस. जाधव या नुकत्याच पदवीधर झालेल्या तरुणाची नेमणूक करण्यात आली होती. बातम्याचे महत्व लक्षात घेऊन इ.स.१९४८ पासून ' प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया ' या वृत्तसंस्थेच्या बातम्या ' पुढारी ' ने घेण्यास सुरुवात केली.एक वेळ तर अशी होती की कोल्हापूरात ' पुढारी ' हे एकमेव पत्र ' प्रेसट्रस्ट ऑफ इंडिया ' चे वर्गणीदार

असल्याने प्रेस ट्रस्टला दुप्पट भाडे द्यावे लागे व शिवाय ऑफिससाठीही त्यांना जागा द्यावी लागली होती.

`पुढारी` चे धोरण कोल्हापूरातील राजनिष्ठ जनतेला खास आवडणारे होते. बहुजन हिताचे कंकण बांधलेल्या `पुढारी` ला राजर्षी शाहु महाराजांची गादी पवित्र वाटत होती. `छत्रपती हे मराठ्यांचे श्रध्दास्थान आहे, त्या श्रध्देने लोकोध्दाराचे सेतू हा हा म्हणता बांधता येतील त्या श्रध्देचा अंत झाला, तर लोकोद्धाराचे एक अमोघ आयुध आपण गमावून बसू असे गणपतराव म्हणत असत म्हणून पुढे संस्थानच्या विलिनीकरणाच्या वेळी `पुढारी` ने स्थानिक लोकमतानुसार विलिनीकरण विरोधी भूमिका घेतली. पण विलिनिकरण झाल्यावर मात्र `पुढारी` ने मोकळ्या मनाने त्याचे स्वागत केले. `पुढारी` पत्र कोल्हापूरात संस्थानातील राजनिष्ठ जनतेचे मत प्रकट करण्यासाठी जन्मले होते आणि त्याने ते कार्य निरपेक्षपणे कळकळीने केले ते ऐतिहासिक कार्य संपल्यानंतर दक्षिण महाराष्ट्रातील जनतेच्या सेवेचे वृत्त `पुढारी` ने स्वीकारले. त्या भागातील लोकजीवनाशी समरस होण्याचा प्रयत्न असल्यानेच हे पत्र लोकप्रिय ठरले.[३०]

ग.गो.जाधव - पूर्वायुष्य --

गणपतराव जाधव हेच `पुढारी` चे खरेखुरे शिल्पकार ! त्यांच्या परिश्रमातून पुढारीला दक्षिण महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक, गोवा येथील आम मराठी जनतेचे मुखपत्र असा लौकिक प्राप्त झाला आहे. तेव्हा गणपतराव जाधवांचे पूर्वजीवन, शिक्षण, व्यक्तिमत्वाची जडण घडण, पत्रकारितेच्या क्षेत्रातील, त्यांची उमेदवारी इ. बाबींची येथे चर्चा करणे संयुक्तिक ठरेल. गणपतरावांचा जन्म १९०८ साली मे महिन्याच्या चार तारखेस, मराठेशाहीच्या काळात अत्यंत महत्व पावलेल्या गगनबावडा या इतिहास प्रसिध्द ठिकाणी झाला. गगनबावडा हे पंत अमात्यांच्या जहागीरीचे गाव, गणपतरावांचे आजोळ, गणपतरावांचे बालपण याच ठिकाणी गेले व त्यांच्या प्राथमिक शिक्षणास सुरुवातही याच ठिकाणी झाली. राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षण प्रसाराच्या चळवळीने त्यावेळी

कोल्हापूर संस्थानचे सारे वातावरण भारून गेले होते. ठिकठिकाणी शिक्षण परिषद होत होत्या. मराठादी बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी ठिकठिकाणी वसतिगृहे निघत होती. माध्यमिक व प्राथमिक शाळा निघत होत्या. खालच्या वर्गातील मुलांनी शिक्षण घ्यावे ही मोहिम जोरात सुरु होती. त्याचा इष्ट परिणाम झाला. अशिक्षित आणि श्रमजीवी पालकांनाही आपल्या मुलाने शिकवावे, मोठे व्हावे असे वाटू लागले. `भटाबामणासारखे शिकून काय करायचे ? त्यापेक्षा शेतात नांगर धरला तर पोटभर खायला धान्य तरी मिळेल` हि पूर्वापार चालत आलेली वृत्ती लोप पावत चाललेली होती. या वातावरणाचा फायदा गणपतरावांना चांगला मिळाला. ते शाळेत जाऊ लागले. इतकेच नव्हे तर शाळेतील पांढरपेशी मुले जशी लिहितात, वाचतात आणिबोलतात तसेच आपल्यालाही लिहिता, वाचता आणि बोलता आले पाहिजे ही ईर्षा बालपणीच त्यांच्या मनात निर्माण झाली. याच काळात त्यांना वाचनाचीही गोडी लागली. त्यांच्या मनावर ब्राह्मणेत्तर व सत्यशोधक समाज चळवळीचे संस्कार झाले. कोल्हापूरात येवून गणपतराव इ.स.१९२५ मध्ये मुलकी परीक्षा पास झाले. त्यानंतर पुढे काय करावयाचे असा प्रश्न उभा राहिला. इंग्रजी शिक्षण घ्यावे अशी घरची परिस्थिती नव्हती. कोल्हापूर संस्थानात त्या काळी खूप शैक्षणिक सवलती उपलब्ध होत्या परंतु त्या सवलतींचा फायदा घ्यावा अशी परिस्थिती ब-याच श्रमजीवी कुटुंबात नव्हती. त्याच अवस्थेत गणपतरावांचे पालक ही होते, त्यानी एका वर्षात तीन इंग्रजी इयत्ता करणा-या वर्गात नाव घातले. योगायोगाची गोष्ट अशी की ती परीक्षा ते पास झाले.[३१]

गणपतराव १९२५ साली फायनलची मराठी सातवी परीक्षा चांगल्या मार्कांने पास झाले आणि त्यांनी एका वर्षात इंग्रजी तिसरी पर्यन्त शिक्षण पूर्ण केले. चौथी होऊ शकली नाही. होणार ही नव्हती. चौथीची पुस्तके मिळाली नाहीत. पुस्तके विकत घेण्याइतकी `माया` जवळ नव्हती. पैशाची काहीच व्यवस्था होण्यासारखी नव्हती. नाईलाजाने त्यांना शाळेचा नाद सोडावा लागला. मन कष्टी झाले. पण त्याला इलाज नव्हता. शालेय शिक्षणाला येथेच पूर्णविराम मिळाला.[३२]

मराठा समाजातील या हुशार आणि चुणचुणीत विद्यार्थ्यांनी कै. रामचंद्र बाबाजी जाधव उर्फ दासराम यांचे लक्ष वेधून घेतले. दासराम हे एक कट्टर सत्यशोधक व ब्राह्मण्याकर कडाडून हल्ला चढविणारे एक समाज सेवक होते. त्यांना आणि भास्करराव जाधव यांना एक हुशार मदतनीस हवा होता. त्या कामासाठी दासराम यांनी गणपतरावांचे नाव सुचविले. गणपतरावांनी कोल्हापूर सोडून मुंबईला जाण्याचे मान्य केले. भास्कररावांच्या परीक्षेत गणपतराव उत्तीर्ण झाले. आणि त्यांच्या बरोबर ते मुंबईला गेले. १९२७ सालच्या सुमाराची ही घटना आहे. भास्कररावांच्या सान्निध्यात गणपतरावांना राजकारणातील घडामोडींचा परिचय झाला. व्यापक जीवनाचा अनुभव मिळून त्यांना चांगले वाचनही करता आले. भास्करराव जाधव, ब्राह्मणेत्तर चळवळीचे नेते आणि मुंबई प्रांतिक सरकारात मंत्री होते. त्यामुळे भास्कररावांनी 'कैवारी' कार दिनकरराव जवळकर यांचे सहकारी म्हणून गणपतरावांची योजना केली. तिखटवाणीच्या आणि घणाघाती लेखणीच्या भाष्याप्रमु जवळकरांसारख्या व्यक्तींच्या सान्निध्यात वृत्तपत्र व्यावसायाचे धडे गिरविण्याचा गणपतरावांना मोका मिळाला. जवळकरांच्या बराचसा वेळ पुढारीपणाच्या कामात जाई त्यामुळे 'कैवारी' ची सारी उस्तवारी गणपतरावांनाच करावी लागे. दिनकरराव जवळकरांनी १९३० साली कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेऊन तुरुंगवास पत्करला. जवळकरांच्या गैरहजेरीत, गणपतरावांनी 'कैवारी' नेटाने चालविला व कायदे-भंगाच्या चळवळीत ब्राह्मणेत्तरांनी भाग घ्यावा असा आग्रहही कायम धरला. या साठी तरुण गणपतरावांनी धाडस करुन खुद्द महात्मा गांधींची भेट घेतली व 'ही चळवळ ब्राह्मणांची किंवा ब्राह्मणेत्तरांची नाही ही चळवळ आमजनतेची आहे म्हणून तीत सर्वांनी भाग घ्यावा' असा त्यांचा संदेश मिळवून तो प्रसिध्द केला. यामुळे चळवळ बामणांची आहे अशी हेटाळणी करणारांची तोंडेच गणपत-रावांनी बंद केली. जवळकर सुटून आले तेव्हा ब्राह्मणेत्तर चळवळीला उतरती कळा लागून जुन्या पुढाऱ्यांची मदत 'कैवारी' साठी मिळेनाशी झाल्याचे दिसून आले. त्यानंतर जवळकर इंग्लंडला गेले. तशा स्थितीत गणपतरावांनी कैवारीचा

संसार काही दिवस सांभाळला. ब्राह्मणेत्तर चळवळीतील तरुणांना कायदेभंगाच्या चळवळीकडे आणि म्हणून कॉंग्रेसकडे वळविण्याचा ऐतिहासिक कामगिरीच्या क्षेत्रात, जेधे - जवळकरांप्रमाणे गणपतरावांचाही वाटा होता.[33]

मुंबईत गणपतरावांच्या पत्रकारितेचा जम चांगला बसला होता. अच्युतराव कोल्हटकर, मामा वरेरकर, आद्य मौज कार अनंत हरी गद्रे, नाटककार सारोळकर, इत्यादींशी गणपतरावांचे घनिष्ठ संबंध जडले होते. यामुळे मुंबईतील पत्रसृष्टीतच गणपतराव स्थिर होण्याची शक्यता निर्माण झाली होती. पण जवळकरांचा अकाली मृत्यू झाल्याने गणपतरावांचा मुख्य आधारच गेला.

जवळकरांच्या निधनाने गणपतराव जाधवांचे मुंबईतील सारस्य संपले. त्यांनी मुंबई सोडण्याचा निश्चय केला व १९३० साली ते कोल्हापूरला परत गेले. कोल्हापूरात त्यावेळी चालू असलेल्या 'सत्यवादी' पत्रात काही काळ त्यांनी लेखन केले पण तेथील पगारावर भागणे शक्य नसल्याने इतर काही उद्योग शोधणे आवश्यक झाले. 'विद्याविलास' चे श्री रघुनाथराव गोखले यांच्याशी गणपतरावांचे संबंध आले होते. त्यामुळे एखादा छापखाना काढण्याचा विचार त्यांच्या मनात घोळू लागला. 'सत्यवादी'त मॅनेजर असलेले शंकरराव भोसले यांना भागीदार करुन गणपतरावांनी छापखाना सुरु केला पण तेवढयावर त्यांचे समाधान होणे शक्यच नव्हते म्हणून १९३३ साली राजाराम महाराजांच्या वाढदिवसाच्या दिवशी गणपतरावांनी 'सेवक' साप्ताहिक सुरु केले. 'सेवक' मधील लेखन व सजावट यामुळे हे पत्र लवकरच लोकप्रिय झाले. गणपतरावांचा मुंबईतील अनुभव विशेष उपयुक्त ठरला. प्रचलित विषयांचा परामर्श, अचूक मर्मभेद करणारे 'शरसंधान', एखादीच चटकदार कथा, करवीर वृत्त इ. सदरा प्रमाणेच प्रबोधनकार ठाकरे यांचे 'शनिवारचे फुटाणे' हे सदर विशेष आकर्षण ठरले. नामवंत पत्रकार र.गो. सरदेसाई हे ही सेवक मध्ये लिहित असत. कोल्हापूरच्या वृत्तपत्र सृष्टीत 'सेवक' ने डौल आणला गणपतराव जाधवांच्या संपादकीय कर्तृत्वाचा तो प्रभाव होता.[34]

'सेवक' साप्ताहिक गणपतराव जाधव चालवत होते. बहुजन समाजाचे प्रश्न

मांडणारा बहुजन समाजातील संपादक असा लौकिक तेव्हाही गणपतरावांनी मिळविलेला होता. गणपतरावांनी वृत्तपत्रीय कामाचे प्राथमिक धडे दिनकरराव जवळकर यांच्या सारख्या धारदार लेखणीच्या संपादकाजवळ बसून गिरवले होते. 'सेवक' पत्र स्वत:च्या हिंमतीवर चालवून, गणपतराव व शंकरराव मोसले या जोडीने स्वत: चा असा एक वाचकवर्ग आणि हितचिंतक वर्ग कोल्हापूर संस्थानात निर्माण केला होता. त्यामुळे विखुरलेल्या बहुजन समाजात जागृती निर्माण करण्यासाठी नवीन ध्येयनिष्ठ वृत्तपत्र सुरु करु इच्छिणाऱ्या कोल्हापूरातील मातब्बर मंडळींना आपल्या संकल्पित पत्रासाठी गणपतरावांचे सहकार्य मिळविणे महत्वाचे वाटणे साहजिक होते पण गणपतराव आपले चालते पत्र बंद करुन, नवी जबाबदारी घेण्यास तयार होतील की नाही, या बाबत त्यांना शंका वाटत होती. बऱ्याच दिवसांच्या वाटाघाटी नंतर गणपतरावांनी आपले पत्र बंद करुन नवीन जबाबदारी घेण्यास अखेर मान्यता दिली.[३५]

पुढारीचे मालक --

पुढारीच्या संपादकीय विभागाशी गणपतराव जाधव प्रारंभापासूनच निगडीत होते. १ जानेवारी १९३९ ला दैनिक बनलेल्या या पत्राचे ते २७ जानेवारी १९३९ पासून अधिकृत संपादक म्हणून काम करु लागले. १९४२ च्या चळवळीमुळे परिस्थिती आणखी बिघडली. संस्थानी राजवट बदलली. अशा परिस्थितीत आर्थिक नुकसानाची जिम्मेदारी पत्करुन 'पुढारी' कोणी चालू ठेवायचा असा प्रश्न पडला. शेवटी चालकांपैकी रा.ब.दत्तोबासाहेब मोसले, व्ही.टी.पाटील, व के.जी. सबनीस यांनी दैनिक 'पुढारी' आणि श्री छत्रपती प्रेसची मालकी गणपतराव जाधव यांच्याकडे १२ डिसेंबर १९४३ रोजी सोपवली. अर्थात त्याच बरोबर कर्जाचा बोजा ही गणपतरावांना पत्करावा लागला. गणपतरावांनी ही सर्व जबाबदारी स्वीकारुन पत्र चालू ठेवले व आज त्याचे एक अग्रगण्य दैनिक म्हणून एका सुस्थिर संस्थेत रूपांतर करण्याची किमया त्यांनी केली.[३६]

`पुढारी` हे कोल्हापूरातील एक प्रमुख दैनिक होय. या दैनिकाची जी वाढ प्रगती झाली आहे तिचे संपूर्ण श्रेय त्याचे संपादक गणपतराव गोविंद जाधव यांच्या संपादकीय व व्यवस्थापकीय कर्तृत्वाला दिले पाहिजे. `पुढारी` पत्राची जहाल,धडाडीचे पत्र अशी कीर्ती नाही पण समतोल वृत्तीचे,कोणाच्या आहारी न जाता आपले मत ठामपणे मांडणारे त्या बरोबर बहुजन समाजाच्या हिताचे काय आहे, याची नेमकी जाणीव ठेवणारे पत्र म्हणून या पत्राची ख्याती आहे. कोल्हापूरात अनेक शासकीय उलथापालथी झाल्या.दक्षिण महाराष्ट्रातील एक नामवंत,आघाडीचे पत्र ही जशी त्याची मर्यादा आहे,त्याप्रमाणे ते त्याचे वैशिष्ट्य होय.[३७]

महाराष्ट्राच्या प्रबोधनातील `पुढारी` आणि पुढारीकार श्री.ग.गो.जाधव यांचे स्थान अन्यन्यसाधारण असेच आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण जीवनाशी समरस होऊन,मराठी वृत्तपत्र सृष्टीमध्ये स्वत:ची अशी एक वैशिष्ट्यपूर्ण मुद्रा `पुढारी` ने उमटविली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय,शैक्षणिक,सहकार,शेती,उद्योग,व्यापार,कला,क्रिडा,धर्म आणि संस्कृती अशा अनेक विविध क्षेत्रात गेल्या पाच दशकातील `पुढारी` ने केलेले विधायक कार्य अत्यंत मोलाचे आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

## संदर्भ व तळ टिपा


१ केळकर न.चिं., वृत्तपत्रमीमांसा, पृ.३

२ देशपांडे अ.वा., आधुनिक मराठी वाङ्‌मयाचा इतिहास,भाग-१, पृ.४३७.

३ फाटक न.र., मराठी नियतकालिकांचा इतिहास,प्रस्तावना,पृ.५.

४ फाटक न.र., वृत्तपत्रांचा इतिहास, प्रस्तावना,पृ.१३.

५ कानडे रा.गो., मराठी नियतकालिकांचा इतिहास,प्रस्ताविक,पृ.२.

६ निर्मळे हरिचंद्र सिद्राम, दलितांची मराठीतील नियतकालिके एक विवेचक अभ्यास,(इ.स.१८७४ ते १९५० ),अप्रकाशित पीएच.डी.,प्रबंध,शिवाजी विद्यापीठ, वर्ष १९८१,पृ.१६

७ कित्ता,पृ.१७.

८ कित्ता,पृ.१७.

९ जोग रा.श्री.मराठी वाङ्‌मयाचा इतिहास,खंड ५,भाग-१, प्रास्ताविक,पृ.६.

१० देशपांडे अ.ना.,उ.नि.,भाग-१,पृ.५८.

११ लेले रा.के.,मराठी वृत्तपत्रांचा इतिहास,पृ.४८-५१.

१२ कित्ता,पृ.५३-५४.

१३ धारूरकर वि.ल.,भारतीय वृत्तपत्रात मराठी वृत्तपत्र सृष्टी,(लेख ) 'पुढारी' कार ग.गो.जाधव,गौरव ग्रंथ,१९८२,संपादक डॉ.एस.एस.भोसले, पृ.७७.


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१४ कित्ता, पृ. ७८

१५ कित्ता, पृ. ७८-७९.

१६ कित्ता, पृ. ७९-८०.

१७ कित्ता, पृ. ८०.

१८ कित्ता, पृ. ८१.

१९ कित्ता, पृ. ८२-८३.

२० कित्ता, पृ. ८५-८६.

२१ कित्ता, पृ. ८६-८८.

२२ कित्ता, पृ. ८९-९०.

२३ कित्ता, पृ. ९१-९३.

२४ कित्ता, पृ. ९३.

२५ कित्ता, पृ. ९५

२६ लेले रा.के., उ.नि., पृ. ७४७-४८.

२७ कित्ता, पृ. ८१४.

२८ प्रा.कुंमार दुष्यन्त, डॉ.भोसले एस.एस. `, ग.गो.जाधव, व्यक्ति दर्शन` (लेख ) ` पुढारी` कार ग.गो.जाधव गौरव ग्रंथ ,१९८२ संपादक डॉ.एस.एस.भोसले, पृ. ४९-५०.

२९ कित्ता, पृ. ५०-५१.

३० लेले रा.के., उ.नि., पृ. ८१६-१७.

३१ पाटील सर्जेराव, सेवेचा दीप उजळणारा झुंजार` पुढारी` गणपतराव जाधव (लेख ), ` कोल्हापूरची मोठी माणसं `( संपादक ) भिकशेठ ज्ञानदेव पाटील, पृ. ६६.

३२ प्रा.कुंमार दुष्यन्त व डॉ.भोसले एस.एस., उ.नि., पृ. ३२.

३३ लेले रा.के., उ.नि., पृ. ८१८.

३४ कित्ता, पृ. ८१३.

३५ कित्ता, पृ. ८१४-१५.

३६ कित्ता, पृ. ८१७.

३७ कित्ता, पृ. ८१२.